# पनवेल महानगरपालिका

## जाहीर निविदा

## पमपा/घकवि/२५२४/प्र.क्र.२२९/७३६/२०२४

## पनवेल महानगरपालिका हद्दीमधील खारघर येथील स्काय वॉकची दैनंदिन आधुनिक पद्धतीने साफसफाई करणेकरिता Ride-on Type Floor Cleaning मशिन खरेदी करणे.

## २०२४-२०२५

| | | | |
|---|---|---|---|
| उप आयुक्त | मु.ले.अ. | मु.ले.प. | अतिरिक्त आयुक्त |

# पनवेल महानगरपालिका

## जाहीर निविदा नोटीस

मा.आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व अनुभवी व्यक्ती, संस्था, ठेकेदार, किंवा कंपनी यांचेकडून निविदा पद्धतीने निविदा मागवीत आहेत. खालील कामाचे कोरी निविदा फॉर्म www.panvelcoporation.com या संकेत स्थळावर दि. १३/०९/२०२४ ते दि. २०/०९/२०२४ पर्यंत सायंकाळी १६.०० पर्यंत उपलब्ध राहणार आहेत. सदरच्या जाहीर निविदा घनकचरा व्यवस्थापन विभागात स्वीकारण्यात येतील.

| अ.क्र. | कामाबाबत तपशील | कामाची मुदत | बयाणा रक्कम | कोरी ई-निविदा फॉर्मची किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका हद्दीमधील खारघर येथील स्काय वॉकची दैनंदिन आधुनिक पद्धतीने साफसफाई करणेकरिता Ride-on Type Floor Cleaning मशिन खरेदी करणे. | ०६ महिने | रु. १०,०००/- | रु. १,०५० /-<br>(जी.एस.टी. सह) |

## जाहीर निवीदा प्रसिध्देचा तपशिल

| Stage | Date | Time |
|---|---|---|
| Publish Date | १३/०९/२०२४ | At १०:०० |
| Document Download Start Date | १३/०९/२०२४ | At १०:०० |
| Document Download End Date | २०/०९/२०२४ | At १८:०० |
| Bid Submission Start Date | १३/०९/२०२४ | At ११:०० |
| Bid Submission End Date | २०/०९/२०२४ | At १६:०० |
| Bid Opening Date | २०/०९/२०२४ | At १७:०० |

**अतिरिक्त आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

# पनवेल महानगरपालिका

## निविदा अटी व शर्ती

**कामाचे नाव :-** पनवेल महानगरपालिका हद्दीमधील खारघर येथील स्काय वॉकची दैनंदिन आधुनिक पद्धतीने साफसफाई करणेकरिता Ride-on Type Floor Cleaning मशिन खरेदी करणे..

**निविदा क्रमांक :-** पमपा/घकवि/२५२४/प्र.क्र.२२९/ /२०२४

### A. आवश्यक पात्रता

१. निविदाधारकाकडे अथवा निविदाधारकाच्या उत्पादकाकडे महानगरपालिका अथवा कोणताही शासकीय / निम:शासकीय Floor Cleaning मशिन पुरविणे कामाचा ०१ कामाचा अनुभवाचा दाखला.

२. मागील ०३ वर्षाची सरासरी वार्षिक उलाढाल रु. ७.५० लक्ष असावी.

३. मागील ०३ वर्षांचे आयकर विवरण पत्र.

४. GST प्रत व पॅन कार्ड प्रत असणे आवश्यक.

५. उत्पादकाचे Authorization Certificate जोडणे बंधनकारक आहे.

६. बयाणा रक्कम भरले बाबतची पावती सोबत जोडणे आवश्यक.

### B. निविदा अटी व शर्ती

१. निविदाधारकाने सदरकामी ५% सुरक्षा अनामत बंधनकारक राहील.

२. महानगरपालिका मालमत्तेचे कोणत्याही प्रकारे नुकसान होणार नाही याची खबरदारी घेणे बंधनकारक राहील.

३. निविदाधारकाने महानगरपालिकेस खालील प्रमाणे साहित्य पुरवायचे आहे. Floor Cleaning मशिनचा तांत्रिक तपशील खालीलप्रमाणे आहे.

| Physical Characteristics | |
|---|---|
| Type of Drive | Battery Operated |
| Machine Working Type | Ride-on |
| Scrubbing Width (mm) | Above 1199 |
| Squeegee Width (mm) | Above 1199 |
| Suction Width (mm) | Above 1199 |
| Cleaning productivity (max) (m2/h) | 5000-5999 |
| Net Weight of machine (Kg) | 550 kilogram |
| Forward speed,Max (km/h) | 10 |
| Vacuum Pressure (KPa) | 24 kiloPascal |
| Power cable length (mtr) | NA |
| Power Supply (V/Hz) | 220-240V/50 Hz |
| Total Power (W) | 2800 |

| | |
|---|---|
| Air Flow (l/s) | 23 |
| Wheels | Solid Rubber |
| Material of Chassis | Mild Steel |
| Material of Body | Mild Steel,Polypropylene |
| Noise Level at 1 m (dBA or dB(A)) | 60 |
| Chemical Auto Dosing | Manual |
| Auto chemical/water and pressure setting with three onetouch settings | No |
| Additional Accessories | Squeegee Blades,Disc Brush |
| Motor Specifications | |
| Brush Motor Capacity (W) | <=1000 |
| Exact Value of Brush Motor Capacity (W) | 1000 |
| Vacuum Motor Capacity (W) | >100<=1000 |
| Exact Value of Vacuum Motor Capacity (W) | 650 |
| Traction Motor Capacity (W) | 550-749 |
| Battery Specifications | |
| Power Source | Rechargeable Battery |
| Battery Chemistry | Lead Acid Battery |
| Battery Chargers for Rechargeable Batteries-inclusive in the scope of supply | Yes |
| Battery Charging time for full Charge (in Hours) | 7 |
| Number of Batteries required for operation | 4 |
| Battery backup time under continuous use (in Hours) | 4 |
| Capacity of Battery (AH) | 360 |
| Brush Specifications | |
| Number of Brushes | 2 |
| Brush Width (in case of roller) (mm) | NA |
| Brush Diameter (mm) | 401-450 |
| Maximum Brush Load,(Kg) | 75 - 99 |
| Type of Brush Load | Non-Adjustable |
| Brush Type | Disc |
| Disc Brush Speed (rpm) | 100 - 299 |
| Cylindrical Brush Speed (rpm) | NA |
| Water Tank Specifications | |
| Fresh water tank (ltr) | 150-180 |
| Dirty water tank (ltr) | 160-190 |
| Certification & Warranty | |
| Availability of Test Report from Central Govt/ State Govt/NABL/ILAC accredited lab | No |
| Test Report to be furnished to the Buyer on demand | NA |
| Restriction of Hazardous Substances Directive (ROHS) Compliance | No |
| CE Certification | No |
| Warranty (Year) | 1 year |

४. संबंधीत निविदाधारकाने आवश्यक साहीत्य या साठी लागणारा खर्च या सर्व बाबींचा विचार करुनच दर सादर करायचे आहेत.

५. निविदाधारकाने साहित्य पुरविल्यानंतर पुढील ०१ वर्ष दुरुस्ती आढळल्यास सदर दुरुस्ती निविदाधारकाने स्वखर्चाने करणे बंधनकारक राहील.

६. निविदाकाराने निविदा सादर केलेल्या दरा व्यतिरिक्त GST वगळुन इतर कोणतेही शासकीय दर/ कर/ इतर भत्ते महापालिका देय असणार नाही.

७. निविदाकाराने महापालिकेबरोबर ठरवुन दिलेल्या कामाचा करारनामा मुद्रांक शुल्क कायदा तरतुदीनुसार स्टँप पेपरवर त्वरीत करुन द्यावा लागेल. त्यानंतरच कार्यादेश देण्यात येईल. करारनाम्यातील अटी व शर्ती संबंधितांवर बंधनकारक राहतील.

८. बालमजुर कायदा, पर्यावरण कायदा १९८६ नियमांचे पालन करणे निविदाकारावर बंधनकारक आहे व कोणत्याही कारणास्तव प्रकरण न्याय प्रविष्ट झाल्यास मा. न्यायालय पनवेल क्षेत्र न्यायालय राहील.

९. निविदेसंबंधि काही वाद निर्माण झाल्यास सदरचा वाद लवादामार्फत सोडविण्यात येईल तसेच सदर लवादासाठी एक व्यक्तीची  सदरचा वाद मिटविण्यासाठी नेमणुक दोन्ही पक्षकारांच्या संमतीने करण्यात येईल.सदर लवादीची प्रक्रीया (Arbitation Act) नुसार करण्यात येईल.

१०. सर्व शासकीय विविध कर भरण्याची जबाबदारी निविदाकारावर राहील.

११. निविदाकारा समवेत महानगरपालिकेने केलेल्या करारनामा/ कार्यादेशाची मुदत ०६ महिन्यांची असेल. सबळ कारणासह मुदतीत वाढ करण्याचा अधिकार महानगरपालिका आयुक्त यांनी राखुन ठेवला आहे.कंत्राट कालावधीतील कामाबाबत कोणताही लेखा आक्षेप आल्यास वसुली निघाल्यास त्याची पुर्तता करणे निविदाकारावर बंधनकारक राहील.

१२. कंत्राटदराने निविदेतील दर हे सर्व पुरवठ्याच्या प्रमाणाचा विचारकरुण सादर करणे बंधनकारक राहील.

१३. विभागाने निर्धारित केलेल्या निश्चित परिमाणाशी आलेल्या बाबनिहाय दरांचा एकत्रित घोषवारा तयार करुन त्या आधारे L१ निश्चित करण्यात येईल.

१४. वरील अटी व शर्तींमध्ये कोणत्याही प्रकारचे बदल करण्याचे अधिकार महानगरपालिकेस राहतील.

## C. दंड (Penalty Clause)

१. निविदाधारकाने आवश्यक साहित्य / आवश्यक नग  न पुरविल्यास, साहित्यांचा गुणवत्ता योग्य नसल्यास निविदाधारकाने सादर केलेल्या प्रती नग दराने दंड आकारण्यात येईल.

२. निविदाधारकाने मशिन न पुरविल्यास रु. १०००/- प्रति दिन प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

३. निविदाकाराने काम समाधानकारक न केल्यास किंवा काम मध्येच सोडल्यास दंड आकारण्यात येईल. तसेच कार्यादेश व करारनामा रद्द करण्यात येईल.

४. निविदाकाराचे कामाबाबत अनियमितता अथवा काम समाधानकारक न आढळल्यास सात दिवसाची लेखी नोटीस देऊन त्याचे कंत्राट रद्द करण्यात येईल. व निविदाकाराने जमा केलेली इसारा रक्कम जप्त करण्यात येईल व कंत्राटदारास काळया यादीत टाकण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल

**अतिरिक्त आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

# पनवेल महानगरपालिका

## आर्थिक लिफाफा

**कामाचे नाव :-** पनवेल महानगरपालिका हद्दीमधील खारघर येथील स्काय वॉकची दैनंदिन आधुनिक पद्धतीने साफसफाई करणेकरिता Ride-on Type Floor Cleaning मशिन खरेदी करणे.

**निविदा क्रमांक :-** पमपा/घकवि/२५२४/प्र.क्र.२२९/ /२०२४

| अ.क्र. | कामाचे नाव | परिमाण | दर प्रति नग (जी.एस.टी. वगळून) |
|---|---|---|---|
| १ | Ride-on Type Floor Cleaning मशिन. | ०१ | रु.------ |

- साहित्यांच्या प्रमाणामध्ये वाढ अथवा घट करण्याचे अधिकार महानगरपालिकेस राहतील.

**निविदाधारकाची स्वाक्षरी**

**अतिरिक्त आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**